MHSN150002642021



# निशाणी क्र.७६ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.१२ यांनी त्यांचेविरुध्द झालेला विना कैफियत व विना म्हणणे हुकूम रद्द होऊन दाव्याकामी कैफियत व म्हणणे दाखल करणेस परवानगी मिळणेसाठी केलेला आहे.

(२) प्रतिवादी क्र.१२ यांचे असे कथन आहे की, सदरील प्रतिवादी क्र.१२ या महिला असलेने त्यांचे प्रापंचिक व्यापातून वादीचे दाव्यास कैफियत व म्हणणे देणेसाठी आवश्यक असणारी महत्वाची कागदपत्रे वेळेत मिळाली नाहीत. त्यांनी जाणूनबुजून कैफियत व म्हणणे दाखल करणेस विलंब केला नाही. तरी प्रतिवादी क्र.१२ यांचेविरुध्द झालेला विना कैफियत व विना म्हणणेचा हुकुम रद्द करणेचा आदेश व्हावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

(३) वादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी निशाणी क्र.७६ वरील अर्जावरच म्हणणे सादर करुन प्रतिवादी क्र.१२ यांचे अर्जातील मजकूर मान्य नसलेचे कथन केले. प्रतिवादी क्र.१२ यांचा सदरचा अर्ज व त्यातील कथने संयुक्तीक नाहीत. प्रतिवादी यांनी जाणीवपूर्वक कैफियत देणेस विलंब केलेला आहे, त्यामुळे सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

(४) प्रतिवादी यांचा निशाणी क्र.७६ वरील अर्ज, त्यापुष्ट्यर्थ दाखल केलेले प्रतिज्ञापत्र व निशाणी क्र.७६ वरील वादी यांचे म्हणणे यांचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी तर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादी क्र.१२ ला दाव्याचे कामी समन्सची बजावणी होऊनदेखील ते मुदतीत कैफियत व म्हणणे दाखल करु शकलेले नाहीत. म्हणून, नि.क्र.०१ वर दि.०४.०७.२०२५ रोजी विना कैफियतचा व विना म्हणणे आदेश पारीत झालेला आहे. परंतु, प्रस्तुत दाव्याकामी या प्रतिवादींची कैफियत व म्हणणे आल्यास दाव्याचे कामकाज पुढे चालून दावा गुणदोषावर निकाली होण्यास मदत होणार आहे. तसेच प्रतिवादी क्र.१२ यांची कैफियत व म्हणणे

अभिलेखावर आले तर वादीचे काही नुकसान होणार नाही. त्यामुळे, दाव्याचे स्वरुप विचारात घेता व प्रतिवादी क्र.१२ यांनी केलेला विलंब विचारात घेता सदरचा अर्ज भुर्दंडासहीत मंजूर करणे न्यायोचित वाटते. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे;

## आदेश

प्रतिवादी क्र.१२ यांचा निशाणी क्र.७६ वरील अर्ज र.रु.२००/- इतका भूर्दंड वादींना देणेचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE

Digitally signed by VAISHALI DIGAMBARRAO SHIRSE
Date: 2025.08.04 18:21:31 +0530

विटा. (श्रीमती. व्ही.डी.शिरसे)
दि.०१.०८.२०२५. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
विटा, ता.खानापूर, जि.सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per the original.

Name of Stenographer :- G.U.Varude,
Name of the Court :- Smt. V. D.Shirse,
Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,
Vita. Tal:-Khanapur.
Date of decision :- 01.08.2025
Order signed by P.O. on :- 01.08.2025
Order uploaded on :- 04.08.2025.